सहायक अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, देवगड

रे.दिवाणी मु.नंबर 89/२०१६

## देवगड येथिल मे.दिवाणी न्यायाधीश ( 'क' स्तर ) यांचे कोर्टात

श्री. बाळकृष्ण मारुती सावंत - वादी

विरूध्द

श्री. जयवंत मारुती सावंत वगैरे - प्रतिवादी

**वादी तर्फे कोर्ट कमिशन करीता अर्ज खालीलप्रमाणे -**

१) प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन त्यातील वादीच्या हिश्श्याचा तुटक कब्जा मिळणेकरीता तसेच दावा मिळकतीतील प्रतिवादी क्र. १ ने अनाधिकारे तोडलेली झाडे वाहतूक अगर कुणासही विक्री करू नयेत, असा निरंतर मनाई आदेश होणेकरीता दाखल केलेला आहे. वादीने दाव्यासोबत प्रतिवादी क्र. १ विरूध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश होणेकरीता देखील स्वतंत्र अर्ज दाखल केलेला आहे.

२) प्रतिवादी क्र. १ मार्च २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वादी व इतर प्रतिवादींच्या अपरोक्ष त्यांना कोणतीही जाणिव अगर कल्पना न देता अगर त्यांची संमत्ती न घेता दावा मिळकतीतील मौल्यवान अशी जुनी ४५ सागवान जातीची व ईतर मोठी १५ झाडे मिळून एकुण ६० झाडे अनाधिकारे तोडली व ती दावा मिळकतीत तोडलेल्या अवस्थेत एकत्र करून मौजे हडपीड, ता. देवगड येथील स्वत:च्या रहात्या घराजवळ गोळा करून ठेवलेली आहेत. सदर झाडे प्रतिवादी क्र. १ ने उचलू नयेत, वाहतूक करू नयेत व कुणासही विकू नयेत असा तुर्तातुर्त आदेश होणेकरीता वादीने स्वतंत्र अर्ज दिलेला आहे. सदर सर्व झाडांची लांबी, रूंदी, गोलाई, जात इत्यादी सर्व तपशिलाचा आणि वस्तुस्थितीचा पंचनामा होऊन त्याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. प्रतिवादी क्र. १ ने सदर वस्तुस्थितीत फेरबदल केल्यास अथवा झाडे इतरत्र

Issue notice to defendants 27/7/16

Asstt. Supdt
Civil Court, Devgad

B.K.

As
Civil Cou

हलविल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणारे आहे व त्यामुळे कामाची गुंतागुंत देखील वाढणारी आहे.

३) सबब वादीची विनंती अशी की,

प्रस्तुत कामी कुणाही बेलिफ अगर वकिलांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेत यावी व त्यांना मौजे हडपीड येथील प्रतिवादी क्र. १ च्या घराजवळ रचून ठेवलेल्या झाडांची मोजमापे घेऊन तसेच झाडे कोणत्या जातीची आहेत ते पाहून त्याचा सविस्तर पंचनामा करून तो मे. कोर्टात सादर करणेबाबत आदेश करणेत यावेत.

येणेप्रमाणे विनंती अर्ज आहे.

तारीख :- २७/०७/२०१६

ॲडव्होकेट
राजेंद्र रावराणे

**ॲफिडेव्हीट**

मी वादी श्री. बाळकृष्ण मारुती सावंत, वय सु. ५८ वर्षे, धंदा- टूरिस्ट व्यवसाय, राहा. गौरव गॅलेक्सी, फेज २, युरॉनस २०४, सुर्या शॉपींग सेंटरच्या समोर, मिरा रोड (पू.) जि. ठाणे येथे सत्यप्रतिज्ञेवर शपथ घेऊन कथन करतो की, वर नमुद पत्तायादीतील माझा पत्ता माझे स्वत:चे उत्तम माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

ठिकाण- देवगड
तारीख :- २७/०७/२०१६

श्री. बाळकृष्ण मारुती सावंत

ॲडव्होकेट

Solemnly affirmed before me
by Shri Balkrishna Maruti Sawant
who is identified before me
by Adv. Shri. R.V. Raorane
whom I personally know.
Date this day of 27th July 2016

Asstt. Supdt
Civil Court, Devgad

## निशाणी क्र. २१ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयीन आयुक्त यांच्याद्वारे प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीमधील तोडलेल्या झाडांचा पंचनामा होणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीच्या म्हणण्यानुसार त्याने प्रस्तुतचा दावा दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप होवून वादीच्या हिश्श्याप्रमाणे पृथक कब्जा मिळणेसाठी व प्रतिवादी क्र. १ याने बेकायदेशीररित्या दावा मिळकतीमधील तोडलेली झाडे वाहतूक, कुणासही विक्री करु नये यासाठी निरंतर मनाईसाठी दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादीने तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ याने मार्च २०१६ मध्ये दावा मिळकतीमधील मौल्यवान जुनी ४५ सागवान झाडे व इतर मोठी १५ झाडे अशी एकूण ६० झाडे बेकायदेशीररित्या तोडली आहेत. प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीत तोडलेल्या अवस्थेत असलेली झाडे एकत्र करुन मौजे हडपीड तालुका देवगड येथील त्याचे घराजवळ ठेवली आहेत. प्रतिवादी क्र. १ ने सदरची झाडे वाहतूक करु नये व कोणासही विक्री करु नये यासाठी वादीने तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केला आहे. या सर्व झाडांची लांबी, रुंदी, गोलाई, जात इत्यादी तपशिल व वस्तुस्थितीचा पंचनामा न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ याने त्यामध्ये फेरबदल केल्यास अथवा झाडे इतरत्र हलविल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, बेलिफ अगर कोणत्याही वकीलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करुन त्यांनी प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या घराजवळ रचुन ठेवलेल्या झाडांची मोजमापे घेवून सदर झाडे कोणत्या जातीची आहेत याची पाहणी करुन त्याबाबतचा पंचनामा दाखल करणेबाबत वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ५६ ला म्हणणे दाखल करुन

अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ ची आजी गिरीजाबाई हिने दिनांक १८/१२/१९७२ इ. रोजी विनामोबदला बक्षिसपत्राने तिच्या नावे असलेल्या मिळकती प्रतिवादी क्र. १ ला दिल्या आहेत. सदर बक्षिसपत्राच्या आधारे फेरफार क्र. ११०२ अन्वये दिनांक २३/११/१९७४ इ. रोजी प्रतिवादी क्र. १ चे नाव नोंद झाले आहे. सदर नोंदीविरुध्द वादी अगर अन्य कुणीही अपिल केले नाही. अशा प्रकारे दाव्यातील मिळकतींसह गिरीजाबाई हिच्या अन्य मिळकतींचा मालक प्रतिवादी क्र. १ हाच आहे. सदर मिळकतींमध्ये सन १९७२ पासून प्रतिवादी क्र. १ ची कब्जे वहिवाट आहे. त्याची जाणीव व माहिती वादी व इतर प्रतिवादींना आहे. सदर मिळकतींशी वादी व इतर प्रतिवादींचा काहीही हक्कसंबंध नाही. सदर मिळकतींच्या उता—यास पीकपाहणी सदरी प्रतिवादी क्र. १ याचेच नाव नोंद आहे. यावरुन या मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र. १ चीच कब्जे वहिवाट आहे हे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र. १ याने स्वखर्चाने दावा मिळकतीमधील झाडे लावली व जोपासली आहेत. दावा मिळकतीपैकी सर्व्हे क्र. ९० हि.क्र. २४ या मिळकतीमधील ४५ झाडे तोडण्याकरीता प्रतिवादी क्र. १ याने दिनांक २७/१/२०१६ इ. रोजी वनअधिकारी यांच्याकडे परवानगीचा अर्ज दिला होता. सदरचा अर्ज दिनांक ५/२/२०१६ इ. रोजी मंजूर झाला आहे. त्यामुळे वन अधिकारी यांच्या परवानगीनेच व त्यांनी दिलेल्या शर्तीचे पालन करुनच प्रतिवादी क्र. १ ने सदरची झाडे तोडली आहेत. प्रतिवादी क्र. १ याने सदरची झाडे तोडण्याकरीता प्रचंड खर्च केला आहे. याबाबत तक्रार करण्याचा वादीला अधिकार नाही. केवळ प्रस्तुत प्रतिवादीला त्रास देण्यासाठी वादीने हा अर्ज दाखल केला आहे. सबब, या कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादीने सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा व प्रतिवादी क्र. १ चा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ७० ला लेखी निवेदन सादर केले आहे.

५. वादी याने दाव्यामध्ये दावा मिळकती या मयत गिरिजाबाई हिच्याकडे तिच्या पतीपासून मिळालेल्या आहेत असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. १ याने सदर मिळकती मयत गिरीजाबाई हिच्या स्वतंत्र अगर स्वसंपादीत मिळकती आहेत असे मुळीच कथन केले नाही. दिनांक १८/१२/१९७२ इ. रोजीच्या बक्षिसपत्रामध्ये सदर मिळकतीबाबत अदयाप वाटप व्हावयाचे आहे असे नमूद केले आहे असे दिसून येते. यावरुन सदर मिळकती या गिरिजाबाई हिच्या स्वतंत्र अगर स्वसंपादीत मिळकती नसून त्या मिळकती तिच्या सासरच्या मिळकती आहेत हे स्पष्टपणे दिसून येते. निशाण क्र. ६७ सोबत फेरफार क्र. १३०६ बाबत वादग्रस्त नोंदवही प्रकरण दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणामध्ये मयत गिरिजाबाई हिचे पुतणे तुकाराम शिवराम राणे व गंगाराम शिवराम राणे यांनी गिरिजाबाई मयत झाल्यानंतर त्यांची भाऊ हिश्श्यापैकी गिरिजाबाई हिचे नावे असलेल्या खाते क्रमांक ५२ च्या मिळकतींना त्यांची नावे वारसा हक्काने नोंद व्हावी याबाबत मंडल अधिकारी यांच्याकडे अर्ज दिल्याचे दिसून येते. यावरुन देखील गिरिजाबाई हिच्या नावे असलेल्या मिळकती या तिच्या स्वतंत्र अगर स्वसंपादीत मिळकती नसून तिच्या सासरच्या मिळकती आहेत हे स्पष्ट होते. परिणामी सदर दावा मिळकती या गिरिजाबाई हिच्या सासरच्या व तिच्या मयत पतीच्या मिळकती होत्या हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

६. गिरिजाबाई ही सन १९८२ साली मयत झाली याबाबत वाद नाही. गिरिजाबाई मयत झाली तेव्हा तिची मुलगी लिलावतीचे सर्व वारस व सुलोचना असे सर्वजण गिरिजाबाई हिला वारस होते असे निशाण क्र. ६७ व ७४ सोबत दाखल केलेल्या गिरिजाबाई हिच्या वारस प्रकरणाची नोंदवहीच्या उता—यावरुन दिसून येते. ज्या दिवशी गिरिजाबाई हिने तथाकथित बक्षिसपत्र बनविले त्या दिवशी गिरीजाबाई हिचे सदर वारस हयात होते. त्यामुळे त्या दिवशी सदर मिळकती तिच्या एकटीच्या स्वतंत्र व स्वसंपादीत मिळकती होत्या असे मुळीच म्हणता येणार नाही. किंबहूना सदर मिळकती या गिरिजाबाई हिच्या

मुली सुलोचना व लिलावती यांच्या वडीलोपार्जित मिळकती होत्या असे मला वाटते. त्यामुळे अशा सर्व वडीलोपार्जित मिळकतीबाबत कोणाही एका सदस्याला बक्षीसपत्र करुन देता येईल का हे पाहणे आवश्यक वाटते. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी **शिवाप्पा मल्लाप्पा इसापुरे व इतर वि. गणपत मल्लाप्पा इसापुरे व इतर, २०१० (२) बॉम्बे.सी.आर. ६७२** या न्यायनिवाडयामध्ये हिंदू सहदायाद याला त्याच्या अविभक्त हिश्श्याबाबत बक्षिसपत्र करुन देण्याचा मुळीच अधिकार नाही, हिंदू सहदायाद याला त्याच्या स्वतंत्र व स्वसंपादीत मिळकतीबाबत बक्षिसपत्र करुन देण्याचा अधिकार आहे, मात्र त्याला त्याच्या अविभक्त हिश्श्याचे देखील बक्षिसपत्र करण्याचा अधिकार नाही असे स्पष्ट केले आहे. प्रतिवादी क्र. १ च्या म्हणण्यानुसार गिरिजाबाई हिने सर्व दावा मिळकतींचे बक्षिसपत्र त्याचे नावे केले आहे. मात्र वरील कायदेशीर तत्वानुसार गिरिजाबाई हिला या दावा मिळकतींचे बक्षिसपत्र मुळीच करता येणार नाही किंबहूना त्यामधील तिच्या हिश्श्याचे देखील बक्षिसपत्र करता येणार नाही. त्यामुळे सदरचे बक्षिसपत्र कायदेशीर आहे असे प्रथमदर्शनी वाटत नाही.

७. मा. केरळ उच्च न्यायालय यांनी **केसवा कुरुप राघवा कुरुप वि. थॉमस इडिकुला आणि इतर, ए.आय.आर. १९६९ केरळ २१** या न्यायनिवाडयामध्ये बक्षिस घेणा—या व्यक्तीने संबंधीत मिळकती बक्षिस देणार याच्या हयातीत स्विकारणे अनिवार्य आहे, बक्षिस देणार याच्या मृत्यूनंतर सदर बक्षिसपत्र प्रसिध्द करणे किंवा बक्षिस देणार याच्या मृत्यूनंतर त्यामधील मिळकतींचा कब्जा दाखविला असल्यास सदरचा कब्जा हा बक्षिस देणा—या व्यक्तीच्या मयत होण्यापुर्वीचा आहे हे शाबीत होणे आवश्यक आहे असे स्पष्ट केले आहे. प्रस्तुत प्रकरणी गिरीजाबई हयात असेपर्यंत म्हणजेच सन १९८२ पर्यंत प्रतिवदी क्र. १ याने सदर बक्षिसपत्र स्विकारले अगर सदर बक्षिसपत्रामधील मिळकतींचा ताबा त्याच्याकडे आला असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही. दावा मिळकतींच्या कब्जे वहिवाट सदरी प्रतिवादी क्र. १ याचे नाव नोंद आहे. मात्र सदरची नोंद सन १९८२ पूर्वीची

नाही. तसेच गिरिजाबाई मयत होईपर्यंत म्हणजेच सन १९७२ ते सन १९८२ या दरम्यान दावा मिळकती त्याच्या कब्जे वहिवाटीस होत्या असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दिसून येत नाही. तथाकथित बक्षिसपत्रावर बक्षिसपत्र स्विकारणार म्हणून प्रतिवादी क्र. १ ची सही मुळीच दिसून येत नाही. यावरुन सन १९८२ पर्यंत म्हणजेच गिरिजाबाई हयात असेपर्यंत प्रतिवादी क्र. १ ने सदर बक्षिसपत्र स्विकारले किंवा या बक्षिसपत्राच्या आधारे त्याने दावा मिळकतींचा कब्जा घेतला असा कोणताही कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही.

८. तथाकथित बक्षिसपत्रामध्ये **‘ सदर मिळकतीबाबत वाटपाचे कामकाज चालू आहे, सदर मिळकतीच्या सहहिस्सेदारांच्या तक्रारीमुळे ताब्याचे कामकाज स्थगित आहे, यापुढे होणा—या वाटपाच्या ताब्याअन्वये जी मिळकत तिला दिली जाईल तेवढीच मिळकत तुम्हास मिळावयाची आहे, वाटपाच्या ताब्यात आदलाबदल झाल्यास ताब्याप्रमाणे ताब्यात मिळालेली मिळकत ती माझ्यासाठी ताब्यात घेवून तू आपले नाव दाखल करुन घ्यावे ’** असा मजकूर लिहिण्यात आला आहे. या मजकूरावरुन सदर मिळकतीबाबत वाटपाचे प्रकरण त्यावेळी चालू होते व त्या वाटपाच्या कामी प्रत्यक्ष ताबा देण्याचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर गिरिजाबाई हिच्या ताब्यात दिलेल्या मिळकती प्रतिवादी क्र. १ ने ताब्यात घ्यावयाचा असा मजकूर असल्याचे स्पष्ट होते. यावरुन सदर मिळकतीचा ताबा या बक्षिपत्रादिवशी प्रतिवादी क्र. १ याला देण्यात आला होता असे मुळीच दिसून येत नाही. त्यानंतर देखील या मिळकतींचे वाटप झाले होते, वाटपाच्या कामी गिरिजाबाई हिला या मिळकती ताब्यात देण्यात आल्या व तिच्या ताब्यात दिलेल्या मिळकती प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात देण्यात आल्या असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही.

९. प्रस्तुत कामी गिरिजाबाई हयात असेपर्यंत या बक्षिसपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र. १ याचे नाव दावा मिळकतींच्या अधिकार अभिलेखात नोंद झालेबाबतचा कसलाही फेरफार उतारा याकामी दाखल करण्यात आला नाही.

प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ७१ च ७२ सोबत फेरफार क्र. ११०२ ची प्रसिध्द केलेली सुचना याकामी दाखल केली आहे. तलाठी यांनी गिरिजाबाई हिच्या बक्षिसपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र. १ याचे नाव दावा मिळकतींच्या उता—याला नोंद होण्यासाठी फेरफार क्र. ११०२ बनविला होता त्याबाबत कोणाच्या हरकती असल्यास अशा हरकती मागविण्यासाठी सदरची नोटीस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम कलम १५० (२) अन्वये दिनांक १२/१/१९७५ इ. रोजी प्रसिध्द केली होती. मात्र त्यानंतर सदर फेरफाराची नोंद मंडल अधिकारी यांनी मंजूर केली असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी सादर करण्यात आला नाही. प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या म्हणण्यामध्ये सदर बक्षिसपत्राआधारे फेरफार क्र. ११०२ अन्वये दिनांक २३/११/१९७४ इ. रोजी त्याच्या नावाची नोंद झाली असे कथन केले आहे. मात्र फेरफार क्र. ११०२ अन्वये दिनांक २३/११/१९७४ इ. रोजी त्याच्या नावाची नोंद झालेला असा फेरफार उतारा त्याने याकामी दाखल केला नाही. त्यामुळे या बक्षिसपत्राची उघडपणे जाणीव अगर माहिती गिरिजाबाई हयात असेपर्यंत कोणालाही नव्हती हे स्पष्ट होते. त्यामुळे मा. केरळ उच्च न्यायालय यांच्या वर नमूद **केसवा कुरुप** या न्यायनिवाडयानुसार गिरिजाबाई हयात असेपावेतो सदर मिळकतींचा ताबा प्रतिवादी क्र. १ याला मिळाला असल्याचे दिसून येत नसल्यामुळे व असे बक्षिसपत्र झाल्याचे किंवा या बक्षिसपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येत नसल्यामुळे हे बक्षिसपत्र कायदेशीर आहे असे मला प्रथमदर्शनी वाटत नाही.

१०. सबब, वरील सर्व कारणास्तव दावा मिळकती या प्रतिवादी क्र. १ याच्या स्वतंत्रपणे मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत व या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादींचा मुळीच संबंध नाही असे मला प्रथमदर्शनी वाटत नाही. किंबहूना दावा मिळकतीमध्ये वादी व इतर प्रतिवादी यांचा हक्क व अधिकार आहे असे मला प्रथमदर्शनी वाटते. प्रतिवादी क्र. १ याने तोडलेली झाडे दावा मिळकतीमधीलच आहेत याबाबत वाद नाही. अशा प्रकारे प्रतिवादी क्र. १ ने

तोडलेल्या झाडामध्ये देखील वादीचा हक्क व हिस्सा आहे हे स्पष्ट होते. सदरची झाडे दाव्याचा वाद विषय आहेत. त्यामुळे सदरची झाडे किती आहेत, कशा प्रकाराची आहेत, याबाबतची सखोल पाहणी होणे आवश्यक वाटते. त्यामुळे सदर झाडांचा पंचनामा होणेबाबत विधिज्ञांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होणे आवश्यक वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वकील श्री. आय.व्ही.ठाकूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते. त्यांनी वादी व प्रतिवादी क्र. १ यांना पुर्व सुचना देवून मौजे हडपीड, ता. — देवगड येथील प्रतिवादी क्र. १ च्या घराजवळ रचून ठेवलेल्या झाडांची मोजमापे घेवून, सदरची झाडे कोणत्या जातीची आहेत याची पाहणी करावी, तसेच झाडांची लांबी, रुंदी, गोलाई यांची मोजमापे घ्यावीत व त्याबाबतचा पंचनामा करुन त्याचा अहवाल आजपासून ३० दिवसाच्या आत सादर करावा.

३. वादी याने न्यायालयीन आयुक्तांचे शुल्क रुपये २,०००/— आजपासून सात दिवसाचे आत जमा करावे.

४. वादीने वरील पुर्तता केल्यानंतर येणेप्रमाणे कमिशन पत्र पाठविण्यात यावे.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

01/03/2017

देवगड
दिनांक ०१/०३/२०१७

( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

216

दि. सदी

रोख रक्कम रु. २०००/-
(रु. दोन हजार मात्र)
स्विकारलेले ता. ९/३/१८

स.अ.

प्रातिनिधिक सहा. अधी. यांचे असे क.
बँकेकडून आरोपी - वादीकडे
बँ. पौ. वादी रक्कम
कोर्ट कमिशनर फी यांनी
धरलेली रु. २०००/-
न्यायालयीन 'सी' क्रमांक २९६
दिनांक ९/३/२०१८ रोजी जमा आहे
तरी पुढील आदेश होण्यास विनंती आहे
दिनांक ९/०३/२०१८

सहायक अधीक्षक (वित्त)
दिवाणी न्यायालय, देवगड